आपली सेवा आमचे कर्तव्य

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला असून तो दि. २८.०४.२०१५ पासून अंमलात आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे त्याचे उद्दिष्ट आहे.

वरीलप्रमाणे अधिसूचित सेवा नागरिकांना दिल्या जात आहेत किंवा नाही यावर देखरेख, समन्वय, सनियंत्रण ठेवण्यासाठी व या संदर्भात सुधारणा सुचविण्यासाठी उपरोक्त कायद्यान्वये महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग गठीत करण्यात आला असून आयोगामध्ये एक मुख्य आयुक्त व सहा आयुक्त कार्यरत आहेत. आयोगाचे मुख्यालय नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई येथे असून सहा विभागातील मुख्यालयाच्या ठिकाणी आयुक्तांची कार्यालये आहेत.

पात्र नागरीकांना विहित वेळेत सेवा न मिळाल्यास अथवा नियमोचित कारणाशिवाय ती नाकारल्यास अशा निर्णयाविरुद्ध संबंधितांना वरीष्ठांकडे प्रथम व द्वितीय अपिल करता येते व तरीही समाधान न झाल्यास आयोगाकडे तृतीय अपिल करता येते. कसूरदार अधिकाऱ्यास प्रतिप्रकरण रु. ५०००/- पर्यंत दंड होऊ शकतो. या विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसुचित सेवांची यादी सोबतच्या प्रपत्रात दिली आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाची वेबसाईट खालीलप्रमाणे आहे :- https://aaplesarkar.mahaonline.gov.in

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

**विभागाचे नाव : विधि व न्याय विभाग**

## अधिसूचित सेवांची यादी

| अ.क्र. | कार्यालयाचे/ विभागाचे नाव | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील अधिकारी | द्वितीय अपील अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण | कायदे विषयक मोफत सहाय्य | १५ दिवस | सहायक अधिक्षक जिल्हा कायदेविषयक सहाय्य सेवा | सचिव, जिल्हा कायदे विषयक सहाय्य सेवा | अध्यक्ष, जिल्हा कायदे विषयक सहाय्य सेवा |
| २. | धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई | न्यास नोंदणी, मुंबई व इतर जिल्हे | आक्षेपांची पूर्तता केल्यापासून ४ आठवडे | सहायक धर्मादाय आयुक्त | धर्मादाय उप आयुक्त | धर्मादाय सह आयुक्त |
| ३. | निबंधक भागीदारी संस्था | भागीदारी संस्था नोंदणी | आक्षेपांची पूर्तता केल्यापासून ६० दिवस | सहायक निबंधक भागीदारी संस्था, मुंबई/ इतरत्र मुख्य लिपिक, निबंधक भागीदारी संस्था संबंधित कार्यालय | उप निबंधक, भागीदारी संस्था /सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था | निबंधक, भागीदारी संस्था /उप निबंधक भागीदारी संस्था |

तृतीय व अंतिम अपिल राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/नागपूर यांचेकडे करता येईल.

RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १०८] बुधवार, ऑगस्ट ९, २०१७/श्रावण १८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २४४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक ईएसटी.२०१५/१५६०/प्र.क्र. २९०/का. दोन.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (महा. २०१५ चा ३१) मधील कलम ३ (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, विधी व न्याय विभाग सदर अधिनियमातील सार्वजनिक प्राधिकरण म्हणून संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० मधील २१) अंतर्गत राज्यातील पात्र व्यक्तींना संस्था नोंदणीबाबत नियतकालमर्यादेत द्यावयाच्या लोकसेवेसह पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी अधिसूचित करीत आहे.

### अनुसूची

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्यासाठीची नियतकालमर्यादा | लोकसेवा पुरविणारे पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० मधील २१) मधील कलम ३ नुसार संस्था नोंदणी करण्याकरिता शासनास अर्ज सादर करणे. | अर्ज प्राप्त झाल्यापासून कार्यालयीन कामकाजाच्या ३० दिवसांत किंवा प्रकरणपरत्वे संबंधित आक्षेपाचे निराकरण झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या ३० दिवसांत. | सहायक संस्था निबंधक. | संस्था निबंधक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**गो. घ. भन्साळी,**
शासनाचे उप विधी सल्लागार-नि-उप सचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 2nd August 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. EST-2015/1560/C.R. 290/Desk-2.—In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), the Law and Judiciary Department being the Public Authority under the said Act, hereby notifies the public service to be rendered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860), in its application to the State of Maharashtra, to the eligible persons, alongwith the stipulated timelimit for providing such public services, the Designated Officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended hereto, for the purposes of the said Act.

*Schedule*

| Sr. No. | Name of Public Service | Stipulated time limit for providing public service | Designated Officer by whom public service will be provided | First Appellate Authority | Second Appellate Authority |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Registration of Societies as per section 3 of the Societies Registration Act, 1860 (21 of 1860), in its application to the State of Maharashtra. | Within thirty working days from the receipt of application ; or within thirty working days from the date of removal of objection, if any. | Assistant Registrar of Societies. | Registrar of Societies Maharashtra State, Mumbai. | Principal secretary and R.L.A. Law and Judiciary Department Mantralaya Mumbai 400 032. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

G. G. BHANSALI,
Deputy Legal Advisor-*Cum*-Deputy Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.